# महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना

## २९ वा वार्षिक अहवाल सन २०२४ - २०२५




### व्यवसाय वृद्धी

(आकडे कोटीमध्ये)



# * संचालक मंडळ *



श्री. दादाराव भाऊराव तुपकर
(अध्यक्ष)



श्री. संतोष शंकरराव गुडधे
(उपाध्यक्ष)



डॉ. जगन्नाथ रामभाऊ खंडागळे
(संचालक)



श्री. किसन बाळाजी मिसाळ
(संचालक)



श्री. एकनाथ पंढरीनाथ कदम
(संचालक)



श्री. भाऊराव आसाराम चव्हाण
(संचालक)



श्री. विठ्ठल केरबा काचेवाड
(संचालक)



श्री. शरद बाबुराव खोत
(संचालक)



श्री. सचिन भाऊराव टेकाळे
(संचालक)



श्री. नितीन श्रीरंग भोईटे
(संचालक)



श्रीमती मंगल श्रीकांत शेलगावकर
(संचालिका)



श्रीमती वर्षा नामदेवराव पितळे
(संचालिका)



श्री. दिपक दादाराव तुपकर
(तज्ञ संचालक)



ॲड. जगन्नाथ साहेबराव भुतेकर
(तज्ञ संचालक)



श्री. शिवलिंग शेनफडअप्पा करदळे
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

# महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना

रजि.क्र. जे.ए.एल./जे.ए.एल./आर.एस.आर./सी.आर./348/1995-96 दिनांक : 19/02/1996

मुख्य कार्यालय : मस्तगड, जालना - 431 213. : 7559394857
www.mahalaxmipsjln.in   mahalaxmi.jalna@gmail.com

जा.क्र.:   दिनांक :

## अधिमंडळाची वार्षिक बैठक सुचनापत्र

(फक्त सभासदांकरीता)

महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालनाची सन २०२४-२५ ची अधिमंडळाची २९ वी वार्षिक बैठक रविवार, दिनांक ०७/०९/२०२५ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता पाठक मंगल कार्यालय, मुक्तेश्वर द्वार जवळ, जुना जालना येथे संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. दादाराव तुपकर यांचे अध्यक्षतेखाली, खालील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, हि नम्र विनंती.

बैठकीपुढील विषय :

१) दि. २५/०८/२०२४ रोजी झालेल्या अधिमंडळाचे मागील वार्षिक बैठकीचा वृतांत वाचून कायम करणे.
२) संचालक मंडळाच्या संस्थेच्या कार्याबद्दलच्या सन २०२४–२५ च्या वार्षिक अहवालाचे वाचन करणे व तो स्विकृत करणे.
३) सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्विकृत करणे.
४) वैधानिक लेखापरीक्षकाचे सन २०२४–२५ चे लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
५) सन २०२३-२४ चे वैधानिक लेखापरीक्षण अहवालाचे दोषदुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
६) कायदा व नियम यास अनुसरून संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
७) सन २०२५-२६ करीताचे उत्पन्न खर्चाचे व महसूल खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता देणे.
८) सन २०२४-२५ या वर्षाच्या मान्य अंदाजपत्रक तरतुदीपेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.
९) निबंधकांनी जाहीर केलेल्या पॅनालमधील पात्र वैधानिक लेखापरीक्षकाची चालू आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यासाठी नेमणूक करणे. लेखापरिक्षणासाठीचे मानधनास मान्यता देणे.
१०) संचालक मंडळ व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना दिलेल्या, वसूल व येणे कर्जाची कायदा कलम ७५(२)(१) नुसार माहिती घेणे.
११) सुधारित आदर्श उपविधी स्विकारणे बाबत.
१२) कर्मचारी सेवानियम दुरुस्ती बाबत.
१३) उपविधी क्र. ६१(४) चे तरतुदीस अनुसरून ३ वर्षापेक्षा अधिक कालावधीचा न नेलेला लाभांश राखीव निधीकडे वर्ग करणे.
१४) पतसंस्थांच्या ठेवी संरक्षित करणे संदर्भाने सहकार खाते अमलात आणू इच्छित असलेली अंशदान कार्यपद्धती बदलणे बाबत.
१५) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळ यांचे आज्ञेवरून

महालक्ष्मी नागरी सह. पतसंस्था मर्या. जालना Reg.No. 348/95-96

(शिवलिंग करदळे)
मुख्य कार्यकारी अधिकारी

स्थळ : जालना
जा. क्र.: १७०/ २०२५
दिनांक : २० / ०८ /२०२५

टिप :

१) संस्थेचे उपविधी क्र. ३५(३) मधील तरतुदीनुसार सदर अधिमंडळाची वार्षिक बैठक गणपूर्तीअभावी होऊ न शकल्यास सदरील बैठक तहकूब करून, अर्ध्या तासाने त्याच दिवशी व त्याच ठिकाणी म्हणजे दि.०७/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयांचे विचारार्थ व निर्णयार्थ होईल. अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) ज्या सभासदांना विषयपत्रिकेवरील विषयांचे अनुषंगाने काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी लेखी सूचना सभेचे ७ दिवस अगोदर या संस्थेच्या Email ID - mahalaxmi.jalna@gmail.com वर कार्यालयाकडे पाठविण्यात याव्यात.

३) ज्या सभासदांना सभेची नोटीस अथवा अहवाल पाहिजे असल्यास, संस्थेची वेबसाईट www.mahalaxmipsjln.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे अथवा आपले संपुर्ण नांव लिहुन कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संस्थेच्या 7559394857 या क्रमांकावर WhatsApp द्वारे किंवा संस्थेच्या वर नमूद Email ID वर Email द्वारे मागणी करावी. आलेल्या WhatsApp क्रमांकावर / Email ID वर PDF Format मध्ये नोटीस व अहवाल पाठविण्यात येईल.

४) ज्या सभासदांनी संस्थेकडे त्यांचा अद्यावत पत्ता किंवा WhatsApp मोबाईल नंबर नोंदवला नसेल किंवा संस्थेकडे नोंदवलेला मोबाईल नंबर बदलावयाचा असेल त्यांनी तो लगतच्या शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत नोंदवून / दुरुस्ती करून घ्यावा.

## * स्थानिक शाखा सल्लागार मंडळ *

### * वालसावंगी शाखा *

श्री. राजू अशोक भुते, श्री.अनिल सुधाकर जोडपे, श्री. हरिभाऊ विठोबा बेराड,
श्री. नामदेव महादू लोखंडे, श्री. रमेश गोविंदराव सुरडकर, श्री. दिपक रामभाऊ तायडे,
श्री. सोमनाथ मधुकरअप्पा घोडतुरे, श्री. राजू उत्तमराव उदरभरे

### * रोहिलागड शाखा *

श्री. केशव नारायणराव तट्टू पाटील, श्री. अर्जुन भीमराव टकले, श्री. महादेव श्रीमंतराव हुसे

### * परतूर शाखा *

श्री. राजेश नागोराव अंभुरे, श्री. अशोक बिसनलाल सारडा, श्री. संतोष लक्ष्मणराव दिंडे,
श्री. नितीन रामदास खरात, श्री. रामराव अंशिराम काळे

## संस्था प्रगतीवर एक दृष्टीक्षेप

| तपशिल | ३१/०३/२०२१ | ३१/०३/२०२२ | ३१/०३/२०२३ | ३१/०३/२०२४ | ३१/०३/२०२५ |
|---|---|---|---|---|---|
| १ सभासद संख्या | ६३४५ | ६७०६ | ७०७७ | ७६०२ | ७९९० |
| २ सरासरी खेळते भांडवल | ५३,६१,१५,८६२/- | ५६,५५,४०,१०४/- | ६३,२८,२६,१४६/- | ६९,९७,३५,०२५/- | ७४,५४,५२,३९१/- |
| ३ स्वनिधी | ६,१४,८८,६४०/- | ७,२३,८२,४७७/- | ७,५७,७३,२१८/- | ८,३४,६४,०३१/- | ९,५७,३२,००६/- |
| ४ वसूल भागभांडवल | ३,११,४३,३००/- | ३,२५,१०,९००/- | ३,३२,०८,०००/- | ३,३७,८४,०००/- | ३,६२,३५,५००/- |
| ५ निधी/तरतुदी | ८,३२,८७,६००/- | ९,८४,९१,६९३/- | ११,०४,५१,७८०/- | ११,२६,३४,४९१/- | १२,३०,४१,५७०/- |
| ६ ठेवी | ४०,८२,२६,५७४/- | ४६,२०,२८,९०९/- | ४८,५०,८३,३९४/- | ५६,३३,१२,५८७/- | ५८,३९,६२,४४६/- |
| ७ गुंतवणूक (बँक) | १३,२७,१३,४९५/- | १५,१४,६८,०११/- | १४,६९,१५,१३८/- | २१,३१,०८,००८/- | २१,३५,७१,८३४/- |
| ८ कर्ज वाटप (अहवाल वर्ष) | १८,७६,३२,१००/- | ३५,८९,००,२२९/- | ३९,३९,७८,२५४/- | ४४,७७,९४,५९५/- | ५०,०६,२१,३९९/- |
| ९ कर्ज वसुली (अहवाल वर्ष) | १५,०६,३६,९३९/- | ३२,०६,२८,१९१/- | ३६,३५,०९,८४०/- | ४३,२७,५७,५८२/- | ४६,५२,६२,९९८/- |
| १० येणे कर्जबाकी | ३२,२०,६९,८००/- | ३६,०३,४१,८३८/- | ३९,०८,१०,२५२/- | ४०,५८,४७,२६५/- | ४४,१२,०५,६६६/- |
| ११ थकबाकी (एनपीए) रु. | ४,९४,००,३६८/- | ४,७२,६९,४४२/- | ४,४१,२७,५७३/- | २,७५,५५,०४१/- | २,६०,०५,६११/- |
| १२ ग्रॉस एन.पी.ए. % | १५.३४% | १३.१२% | ११.२९% | ६.७९% | ५.८९% |
| १३ नेट एन.पी.ए. % | ७.२७% | ५.१५% | २.९०% | ०.००% | ०.००% |
| १४ मालमत्ता (स्थावर+जंगम) | १,४७,९०,२४१/- | १,५०,८६,४५४/- | १,७२,११,३०२/- | १,७८,२१,१५८/- | १,८०,१७,७२२/- |
| १५ एकुण उत्पन्न | ४,८६,१२,५५१/- | ५,२६,००,१०७/- | ६,४७,०८,२७१/- | ६,७४,४९,६६०/- | ७,८५,९३,८६९/- |
| १६ एकुण खर्च (तरतुदीसह) | ४,१५,५३,४३९/- | ४,५३,७०,२९४/- | ५,७०,५७,३७५/- | ५,५१,४१,६६८/- | ६,२१,०३,०१७/- |
| १७ नफा | ७०,५९,११२/- | ७२,२९,८१३/- | ७६,५०,८९६/- | १,२३,०७,९९१/- | १,६४,९०,८५२/- |
| १८ लाभांश | १०% | १०% | १०% | १०% | (प्रस्तावित) १०% |
| १९ सी.डी.रेशो | ७१.२३% | ६९.३३% | ७२.४४% | ६४.१४% | ६६.४०% |
| २० दैनंदिन रोख तरलता (CRR) | २.८०% | ३.८८% | ४.९२% | ४.८१% | ४.९२% |
| २१ वैधानिक तरलता (SLR) | ३४.७७% | ३०.०६% | २७.६९% | ३४.५०% | ३५.५७% |
| २२ भांडवल पर्याप्तता प्रमाण(CRAR) | - | - | १७.२५% | १७.५३% | १९.७८% |
| २२ लेखापरीक्षण वर्ग | ‘ अ ‘ | ‘ अ ‘ | ‘ अ ‘ | “ अ ” | “ अ ” |

# २९ वा वार्षिक अहवाल

## सन २०२४ - २०२५

सन्माननिय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अहवाल व हिशोब पत्रके, उत्पन्न खर्चाचे व महसुली खर्चाचे अंदाजपत्रक संचालक मंडळाच्या वतीने आपल्यासमोर सादर करीत आहे.

१) **वार्षिक सर्वसाधारण सभा ( अधिमंडळाची वार्षिक बैठक) :**

संस्थेच्या अधिमंडळाची २८ वी वार्षिक बैठक, अहवाल वर्षात दिनांक २५/०८/२०२४ रोजी घेण्यात आली होती. सभेस ४६० सभासद उपस्थित होते.

२) **संचालक मंडळ सभा :**

अहवाल वर्षात एकुण १४ संचालकांचे मंडळ कामकाज सांभाळत असून, संचालक मंडळाच्या एकुण १४ सभा झाल्या. सभेत सर्व निर्णय सर्व संचालकांच्या मंजुरीने घेण्यात आले आहेत.

३) **सभासद :**

पतसंस्थेच्या आजपर्यंतच्या प्रगतीत सर्व सभासदांचा सहभाग व मोलाची साथ मिळालेली आहे. वर्षारंभी सभासद संख्या ७६०२ होती. अहवाल वर्षात ५७३ नवीन सभासद झाले असून, १८५ सभासदांनी राजीनामे दिल्यामुळे वर्षअखेर संस्थेचे ७९९० सभासद आहेत. सर्व सभासदांनी संस्थेत सक्रीय सहभाग घेऊन क्रियाशील सभासद व्हावे, असे आवाहन करण्यात येते.

४) **भागभांडवल :**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रु. ५ कोटी आहे. वर्षारंभी वसूल भागभांडवल रु. ३,३७,८४,०००/- होते. अहवाल वर्षात भागभांडवलात रु. ३९,८६,२००/- जमा झाले असून, राजीनामा दिलेल्या सभासदांचे रु. १५,३४,७००/- भागरक्कम परत केली आहे. दि. ३१/०३/२०२५ अखेर रु. ३,६२,३५,५००/- वसूल भागभांडवल संस्थेकडे जमा आहे. वसूल भांडवल वाढीचे शे. प्रमाण ७.२६% असून, सरासरी खेळते भांडवलाशी वसूल भांडवलाचे प्रमाण ४.८६% आहे.

५) **राखीव निधी, ईतर निधी व तरतुदी :**

संस्थेचा मागील वर्षअखेर निधी रक्कम रु. ११,२६,३४,४९०.८६/- होता. अहवाल सालात त्यामध्ये रक्कम रु. १,०४,०७,०७८.६८ ची वाढ होऊन दि. ३१/०३/२०२५ अखेर संस्थेचा निधी रु. १२,३०,४१,५६९.५४/- झाला आहे. यापैकी राखीव निधीची गुंतवणूक स्वतंत्र बँक खाती रक्कम रु. २,४७,५४,७४६/- केलेली आहे. अहवाल वर्षात संस्थेचे निधीवाढीचे शे. प्रमाण ९.२४% आहे. सरासरी खेळते भांडवलाशी निधीचे शे.प्रमाण १६.५०% आहे.

६) **स्वनिधी :**

संस्थेचा मागील वर्षअखेर स्वनिधी रक्कम रु. ८,३४,६४,०३१/- होता. अहवाल सालात त्यामध्ये रक्कम रु. १,२२,६७,९७५/- ची वाढ होऊन दि. ३१/०३/२०२५ अखेर संस्थेचा निधी रु. ९,५७,३२,००६/- झाला आहे. अहवाल वर्षात संस्थेचे स्वनिधीवाढीचे शे. प्रमाण १४.७०% आहे.

७) **सभासद ठेवी :**

दिनांक ३१/०३/२०२४ अखेर संस्थेच्या ठेवी रु. ५,६३३.१३ लाख होत्या. अहवाल वर्षात रु. १६,९६७.६४ लाख ठेवी जमा होऊन, रु. १६,७६१.१५ लाख रकमेच्या ठेवी परत करण्यात आल्या. दि. ३१/०३/२०२५ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु. ५,८३९.६२ लाख इतक्या आहेत. गतवर्षीपेक्षा चालूवर्षी ठेवीत रु. २०६.४९ लाखाची वाढ झालेली आहे. ठेव वाढीचे शे. प्रमाण ३.६७% असून, सरासरी खेळते भांडवलाशी ठेवीचे शे. प्रमाण ७८.३४% आहे. अहवाल वर्षात ठेवीवर संस्थेने रु. ४३६.२३ लाख व्याज अदा केले आहे.

८) गुंतवणुका :

दिनांक ३१/०३/२०२४ अखेर संस्थेची गुंतवणूक रु. २,१३६.७८ लाख इतकी होती. अहवालवर्षी त्यामध्ये रु. ४.६४ लाखाची वाढ होऊन अहवाल वर्षअखेर गुंतवणूक रक्कम रु. २,१४१.४२ लाख इतकी झाली आहे. अहवाल वर्षात गुंतवणूक वाढीचे शे. प्रमाण ०.२२% आहे व सरासरी खेळत्या भांडवलाशी गुंतवणुकीचे शे. प्रमाण २८.७२% आहे. ३१/०३/२०२५ अखेरील गुंतवणुकीचा तपशील खालीलप्रमाणे.

| गुंतवणूक तपशिल | ३१/०३/२०२४ अखेर | ३१/०३/२०२५ अखेर |
|---|---|---|
| १. बँक गुंतवणूक | २१,३१,०८,००८/- | २१,३५,७१,८३४/- |
| २. भागातील गुंतवणुक | २०,०००/- | २०,०००/- |
| ३. ईतर गुंतवणूक | ५,४९,७७५/- | ५,४९,७७५/- |
| एकूण : | २१,३६,७७,७८३/- | २१,४१,४१,६०९/- |

९) सभासद कर्ज :

दिनांक ३१/०३/२०२४ अखेर संस्थेची सभासद कर्ज येणे बाकी ४,०५८.४७ लाख इतकी होती. अहवाल वर्षात सर्व प्रकारची रु. ५,००६.२१ लाख कर्ज वाटप करण्यात येऊन रु. ४,६५२.६३ लाख इतकी कर्ज वसुली करण्यात आली. दि. ३१/०३/२०२५ अखेर संस्थेची कर्ज येणे बाकी रु. ४,४१२.०५ लाख इतकी आहे. सरासरी खेळत्या भांडवलाशी येणे कर्जाचे शे. प्रमाण ५९.१९% आहे. संस्थेने सभासदांची कर्जविषयक गरज, परतफेड क्षमता, उपविधीतील कर्जविषयक नियम आणि ठेवीदारांच्या उपलब्ध ठेवींची सुरक्षितता अशी चौपदरी सांगड घालणारे कर्जवाटप धोरण निश्चित केलेले आहे.

अहवाल वर्ष अखेर एकुण ३२०९ येणे कर्जदार खाती असून, गतवर्षीपेक्षा येणे कर्ज रकमेत रु. ३५३.५८ लाखाने वाढ झालेली आहे. एकुण कर्जापैकी तारणी कर्ज रु. ३,८३२.०९ लाख असून, एकुण कर्जाशी शे. प्रमाण ८६.८६% आहे. तर विनातारणी कर्ज रक्कम रु. ५७९.९६ लाख असून शे. प्रमाण १३.१४% आहे.

१०) संचालक व त्यांचे कुटुंबीय यांचे कर्ज :

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२)(एक) व सभा सूचनापत्रातील विषय क्र. १० नुसार संचालक व त्यांचे कुटुंबीय यांची कर्जे दिनांक ३१/०३/२०२५ अखेर खालील प्रमाणे असून, संपूर्ण येणे कर्ज हे तारणी कर्ज आहेत.

(आकडे रु. लाखात)

| तपशिल | दि.३१/०३/२०२४ अखेर येणे कर्ज | २०२४-२५ मधील | | दि. ३१/०३/२०२५ अखेर | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वाटप कर्ज | वसूल कर्ज | कर्जदार | कर्ज रक्कम | थकीत रक्कम | थकबाकी |
| संचालक | ०.२३ | १३.५० | १.१० | १ | १२.६३ | निरंक | निरंक |
| कुटुंबिय सदस्य | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| एकुण : | ०.२३ | १३.५० | १.१० | १ | १२.६३ | -- | -- |

संचालक व त्यांचे कुटुंबीय यांचेकडील कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ०.२९% आहे.

११) थकबाकी व एन.पी.ए. :

दिनांक ३१/०३/२०२५ अखेर संस्थेची एकुण येणे कर्जबाकी रु. ४,४१२.०६ लाख इतकी असून त्यापैकी रक्कम रु. २६०.०६ लाख इतकी एन.पी.ए. थकबाकी आहे. एकुण कर्ज येणे बाकीशी एन.पी.ए. थकबाकीचे (ग्रॉस एनपीए) शे.प्रमाण ५.८९% इतके आहे. गतवर्षीपेक्षा यावर्षीच्या एन.पी.ए. प्रमाणामध्ये ०.९०% ने घट झालेली आहे. ढोबळ व निष्क्रिय जिंदगीचे प्रमाण सहकार खात्याचे निर्देशानुसार ५% चे आत असणे आवश्यक आहे. संस्थेने एन.पी.ए. निधीची रु. ३३७.६७ लाखाची तरतूद केलेली आहे. त्यामुळे संस्थेचा निव्वळ (नेट) एन.पी.ए. (-१.९०% म्हणजेच) ०.००% आहे. तर एनपीए खात्यावरील व्याज रु. १६६.७७ लाख तरतूद करावी लागली आहे. त्यामुळे थकबाकीदार कर्जदार सभासद व त्यांचे जामीनदार यांनी त्यांचेकडील थकीत कर्जरकमेचा भरणा करून, एन.पी.ए. चे प्रमाण कमी करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात येते. तसेच संस्थेने नियमाप्रमाणे उत्तम जिंदगी रु. १०.५० लाखाची तरतुद केलेली आहे.

१२) ठेवी व कर्ज प्रमाण (C.D. Ratio) :

शासनाचे निकषानुसार व दिलेल्या सूत्रानुसार सी.डी.रेशोचे प्रमाण ६०% ते ७०% दरम्यान असावयास पाहिजे. संस्थेचे अहवाल वर्षअखेर ठेव व कर्जाचे (सी.डी.रेशो) प्रमाण ६६.४०% असून सदरचे प्रमाण हे शासनाने निर्धारित केलेले सी.डी. रेशोच्या प्रमाणात आहे.

१३) सरासरी खेळते भांडवल :

दि. ३१/०३/२०२४ अखेर संस्थेचे सरासरी खेळते भांडवल रु. ६,९९७.३५ लाख होते. दि. ३१/०३/२०२५ अखेरचे सरासरी खेळते भांडवल रु. ७,४५४.५२ लाख इतके आहे. अहवाल वर्षात खेळत्या भांडवलात रु. ४५७.१७ लाखाने उल्लेखनीय वाढ झालेली असून वाढीचे प्रमाण ६.५३% आहे.

१४) लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण सी.ए. लोकेश गोधा, सनदी लेखापाल, (पार्टनर) लोया अँड मुंदडा चार्टर्ड अकॉटंट्स, छत्रपती संभाजीनगर, यांनी केले असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. संस्थेच्या अहवाल सालातील कामकाजाचे सुयोग्य मूल्यमापन करत असतांना शासनाचे ऑडीट मुल्यांकन प्रणालीनुसार संस्थेस ८७.४०% गुण देऊन सन २०२४ - २०२५ या आर्थिक वर्षासाठी संस्थेस ऑडीट वर्ग " अ " दिलेला आहे. लेखापरिक्षण कालावधीत त्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद.

१५) कर्मचारी वर्ग :

संस्थेच्या यशस्वी विकासासाठी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्वाचे असते. धोरण ठरविणारे संचालक मंडळ असले तरी या धोरणांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे काम कर्मचारी वर्ग करीत असतो. कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत करून, संचालक मंडळाचे मार्गदर्शनाखाली काम केले आहे. संस्था संचालक मंडळाची ध्येय धोरणे प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी संस्थेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सहित २३ कायम व तात्पुरते कर्मचारी कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांच्या कार्यकुशल वृत्तीमुळे संस्थेची वाटचाल विकासाकडे चालू आहे.

१६) प्रशिक्षण कार्यक्रम :

संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी ३ दिवसांचे सहकार विषयक प्रशिक्षण अनिवार्य केले आहे. अहवाल सालात महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., मुंबई व सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित, कराड या प्रशिक्षण संस्थेमार्फत संस्थेच्या संचालक व कर्मचारी यांचेकरिता प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. त्यामध्ये संस्थेचे सर्व कर्मचारी व संचालक सहभागी होऊन, त्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

१७) समारोप व आभार :

संस्थेची आजची नेत्रदीपक प्रगती, प्राप्त झालेला नावलौकिक, मिळालेले वैभव हे सभासदांनी संस्थेस वेळोवेळी केलेले सहकार्य, मोलाचे मार्गदर्शन व संस्थेसाठीचा त्याग याचे फलित होय. त्यामुळे प्रथमतः सर्व सभासदांना धन्यवाद देऊन आभार मानतो. व भविष्यातही अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करतो.

संस्था प्रगतीपथावर आणण्यासाठी ठेवीदार सभासदांचा सर्वात महत्वाचा वाटा असतो. यावर्षी ठेवीमध्ये झालेली वाढ, हि ठेवीदारांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचेच प्रतिक आहे. संस्थेच्या प्रगतीमध्ये ठेवीदार सभासदांनी जो सिंहाचा वाट उचलला आहे त्याबद्दल संस्था त्यांचे शतशः आभार मानून, ठेवीदाराच्या विश्वासास नेहमीच पात्र राहील अशी ग्वाही देतो.

संस्थेच्या बहुसंख्य सभासदांनी घेतलेल्या व जामीनदार असलेल्या कर्जाची वेळेवर व नियमित कर्जहफ्ते भरून संस्थेस वेळोवेळी सहकार्य केले, त्याबद्दल संस्था त्यांचेही आभार मानते व भविष्यातही असेच सहकार्य राहील हि अपेक्षा बाळगते.

मा. जिल्हा ऊपनिबंधक, सहकारी संस्था, जालना, मा. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था, जालना, मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, जालना व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडेरेशन लि. यांनी संस्थेस वेळोवेळी केलेले मार्गदर्शन व सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. संस्थेचे नोकरदार सभासदांची कर्जाची गरज भागविण्यासाठी कर्जकपातीची हमी घेऊन व त्यानुसार वेळोवेळी कर्जहफ्ते कपात करून संस्थेकडे भरण्यासाठी सतत सहकार्य करणारे वेतनअधिकारी, कार्यालय प्रमुख, मुख्याध्यापक, अहरण व वितरण अधिकारी तसेच विविध शासकीय व निमशासकीय पगारपत्रक गटप्रमुख यांचेही संस्था मनःपूर्वक आभार मानते.

संस्थेचे सर्व संचालक, शाखांचे पालक संचालक व स्थानिक शाखा सल्लागार मंडळाने संस्थेस वेळोवेळी मार्गदर्शन करून शाखा वृद्धीसाठी विशेष प्रयत्न केले आहेत, मी त्यांनाही धन्यवाद देऊन आभार व्यक्त करतो. संस्थेचे कायदा सल्लागार, पॅनलवरील वकील, इंजिनियर, गोल्ड व्हॅल्युअर यांनी संस्थेच्या कामकाजात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष सहकार्य केले त्याबद्दल त्यांचेही संस्था आभार मानते.

संस्थेची यापुढेही उत्तरोत्तर आर्थिक उन्नती होवो व सर्व सभासदांमध्ये बंधुभाव कायम राहून सहकार्याची भावना वृद्धिंगत होवो, हि सदिच्छा व्यक्त करून आम्ही हा अहवाल पूर्ण करीत आहोत. जय सहकार !

आपला स्नेहांकित,
दादाराव तुपकर
अध्यक्ष

## आर्थिक वर्ष २०२४-२५ नफा विभागणी शिफारस

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | राखीव निधी (किमान २५%) | ४१,२३,०००/- |
| २ | सभासद लाभांश १०% | ३७,२२,५००/- |
| ३ | सभासद कल्याण निधी | ३,००,०००/- |
| ४ | कर्मचारी अधिलाभांश | ३,५०,०००/- |
| ५ | कॉन्टीजेन्सी तरतुद | ४९,००,०००/- |
| ६ | धर्मदाय निधी | २,००,०००/- |
| ७ | एनपीए तरतुद | २५,००,०००/- |
| ८ | उर्वरित नफा ईमारत निधीस वर्ग | ३,९५,३५१.८२ |
| | एकूण नफा : | १,६४,९०,८५१.८२ |

## संस्थेच्या शाखा

| अ.क्र. | शाखा | पत्ता |
|---|---|---|
| १ | मुख्य शाखा, जालना | मस्तगड, जुना जालना, जालना |
| २ | वालसावंगी | मेन रोड, वालसावंगी, ता. भोकरदन, जि. जालना. |
| ३ | नवा जालना | रामा आर्केड गणेश भुवन समोर, आझाद मैदान रोड, जालना. |
| ४ | रोहिलागड | रोहिलागड, ता. अंबड, जि. जालना. |
| ५ | परतूर | हर्षवर्धन कॉम्प्लेक्स, शासकीय विश्रामगृहासमोर, परतूर. |

# LOYA & MUNDADA
Chartered Accountants

## वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल

**( महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कलम ८१ (१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ नियम ६९ (३) अंतर्गत )**

१) आम्ही, महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना, मुख्य कार्यालय मस्तगड, जुना जालना, जालना (महा) ४३१२१३ नोंदणी क्रमांक : जे.ए.एल./जे.ए.एल./आर.एस.आर./सी.आर-३४८/१९९५-९६ दिनांक १९/०२/१९९६ असून, या संस्थेचा सोबत जोडलेल्या ३१ मार्च २०२५ रोजीच्या ताळेबंदाचे आणि सोबत जोडलेल्या त्या तारखेला संपणाऱ्या आर्थिक वर्षाच्या नफा-तोटा पत्रकाचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण केले आहे. हि वित्तीय पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या प्रबंधकाची असून आमची जबाबदारी या वित्तीय पत्रकावर लेखापरीक्षणाच्या आधारे आमचे मत प्रदर्शित करण्याचे आहे.

२) आम्ही आमचे लेखापरीक्षण भारतात सामान्यत : मान्यता पावलेल्या लेखापरीक्षण मापदंडाच्या आधारे केले आहे. या मापदंडाप्रमाणे आम्हाला वित्तीय पत्रके मोठ्या दोषांपासून मुक्त असल्याचा पूर्ण विश्वास निर्माण होईल. अशा पद्धतीने लेखापरीक्षण आणि त्याची पूर्ण योजना करावी लागते. लेखापरीक्षणात चाचणी तत्वावर वित्तीय पत्रकातील रकमा आणि खुलासे यांना आधार देणाऱ्या पुराव्यांचे परीक्षण अंतर्भूत असते. लेखापरीक्षणात प्रबंधनाने केलेले महत्वाचे अंदाज, वापरलेली लेखातत्वे आणि वित्तीय पत्रकाचे एकंदरीत प्रदर्शन यांचे मूल्यमापण करणे देखील अंतर्भूत असते. आम्ही केलेले लेखापरीक्षण आमच्या मतास पुरेसा आधार देते, असा आमचा विश्वास आहे. आम्ही वरील परिच्छेदात नमूद केलेल्या मर्यादा आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० तसेच नियम १९६१ त्या अंतर्गत येणाऱ्या प्रदर्शनाच्या मर्यादा यांना अधीन राहून अहवाल देतो कि,

अ) आम्ही आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे लेखापरीक्षणकरिता आवश्यक ती सर्व माहिती व स्पष्टीकरण मिळविली आहेत.

आ) आम्ही केलेल्या परीक्षनाच्या आधारावर, आमच्या मते, आमच्या अहवालातील भाग अ, ब व क मधील टिका-टिपणीस अधीन राहून, महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६०, नियम १९६१ व संस्थेच्या पोटनियमानुसार आवश्यक असणारी लेखापुस्तके संस्थेने ठेवलेली आहेत.

इ) आमच्या अहवालातील भाग अ, ब व क मधील टिका- टिपणीस अधीन राहून ताळेबंद व नफा - तोटा पत्रक संस्थेच्या लेखापुस्तकाशी जुळते.

ई) आमच्या मते व आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे आणि आम्हाला मिळालेल्या स्पस्टीकरणाप्रमाणे आणि भारतात सामान्यत : मान्यता पावलेल्या लेखातत्वाप्रमाणे आणि अहवालातील भाग अ,ब व क मधील टिका- टिपणी ना अधीन राहून, संस्थेच्या वितीय लेखा ताळेबंदाच्या बाबतीत ३१/०३/२०२४ रोजीची सत्य व वास्तविक आर्थिक दर्शवितो. नफा - तोटा पत्रकाच्या बाबतीत त्या तारखेला संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तविक स्थिती दर्शवितो.

**३) नागरी सहकारी पतसंस्था यांचे लेखापरीक्षणाच्या वर्गवारीच्या निकषास अनुसरून, संस्थेस प्राप्त गुणानुसार आर्थिक वर्ष २०२४-२०२५ या कालावधीसाठी संस्थेला लेखापरीक्षण वर्ग " अ " देण्यात आला आहे.**

LOYA & MUNDADA FRN 132811W Aurangabad Chartered Accountants

स्थळ : जालना

दिनांक : १०/०६/२०२५

लोया ॲण्ड मुंदडा (सनदी लेखापाल / सी.ए.)

नाव :- श्री. लोकेश गोधा (भागीदार) मे. नं. १४४९२२

नामतालिका क्रमांक : [illegible] वर्गवारी - [illegible]

**Address :** Office No. 315, 3rd Floor, Sai Trade Center, Near Railway Station,
RTO Road, Chh. Sambhajinagar (Aurangabad) – 431001 | **Contact :** +91 9422925422, +91 9422201966
**Email :** mundadagirish@gmail.com, lokeshgodha.1@gmail.com

## एकत्रित ताळेबंद पत्रक [३१/०३/२०२५ अखेर] (नमुना "न")

| मार्च,२०२४ अखेर | भांडवल व देणी | मार्च,२०२५ अखेर | मार्च,२०२४ अखेर | संपत्ती व येणी | मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | अधिकृत भागभांडवल | ५,००,००,०००.०० | १७,११,००६.०० | रोख शिल्लक | २५,६८,६२७.५० |
| ३,३७,८४,०००.०० | वसूल भागभांडवल | ३,६२,३५,५००.०० | २,९०,७९,५२२.३३ | बँक खाते शिल्लक | २,५४,३६,९०७.१८ |
| २,११,०३,४३१.०० | राखीव निधी | २,४२,४२,६३०.०० | २१,३१,०८,००८.०० | बँक गुंतवणुक | २१,३५,७१,८३४.०० |
| ५६,३३,१२,५८६.९२ | ठेवी | ५८,३९,६२,४४५.९१ | २०,०००.०० | भागातील गुंतवणुक | २०,०००.०० |
| ४१,९८,२४१.०० | ठेव देणे व्याज | ३६,७५,४९१.०० | २,१०,८७,८५५.०० | निधी गुंतवणुक | २,४७,५४,७४६.०० |
| ९,१५,३१,०५९.८६ | निधी व तरतुदी | ९,८७,९८,९३९.५४ | ५,४९,७७५.०० | ईतर गुंतवणुक | ५,४९,७७५.०० |
| २६,९२,१०५.३३ | अनामती व ईतर देणी | २६,७८,०१७.३३ | ४०,५८,४७,२६५.४२ | येणे कर्ज | ४४,१२,०५,६६५.५० |
| १,२३,०७,९९१.३८ | एकुण वार्षिक नफा | १,६४,९०,८५१.८२ | ३,६३,४३,४३८.०० | येणे कर्ज व्याज | ३,६२,९६,२९१.०० |
| | | | ३३,६१,३८७.६५ | ईतर येणी | ३६,६२,३०७.६० |
| | | | १,१३,६९,८०८.०९ | जंगम मालमत्ता | १,१५,६६,३७१.८२ |
| | | | ६४,५१,३५०.०० | स्थावर मालमत्ता | ६४,५१,३५०.०० |
| ७२,८९,२९,४१५.४९ | एकुण : | ७६,६०,८३,८७५.६० | ७२,८९,२९,४१५.४९ | एकुण : | ७६,६०,८३,८७५.६० |

## एकत्रित नफा-तोटा पत्रक [०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५] (नमुना "न")

| मार्च,२०२४ अखेर | खर्च बाजु | मार्च,२०२५ अखेर | मार्च,२०२४ अखेर | उत्पन्न बाजु | मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|
| ४,०१,९५,३६२.०० | दिलेले व्याज | ४,३६,३०,५६३.०० | ५,६७,०८,२८०.०० | कर्ज व्याज | ५,८९,३३,९३९.०० |
| ८०,०१,८४८.०० | कर्मचारी पगार | ८१,४०,००३.०० | ८४,३५,९४२.०० | बँक गुंतवणुकीवरील व्याज | १,८०,३४,७५१.०० |
| ९,३४,३६५.०० | कर्म.भविष्य निधी व ग्रॅच्युईटी | १४,६४,४४५.०० | २३,०५,४३७.५४ | ईतर उत्पन्न | १६,२५,१७८.८१ |
| ८,२३,६०९.५० | एजंट कमिशन | ८,८४,४४१.३० | | | |
| ३,३२,०००.०० | ऑडीट व प्रोफेशन फी | ५,८२,३००.०० | | | |
| १०,४१,३६६.०० | टॅक्स, विमा व भाडे | ११,५८,८०५.०० | | | |
| १,९७,०७२.८६ | स्टेशनरी छपाई व खरेदी | १,३८,२५६.०५ | | | |
| २,४८,६७९.१० | लाईट, फोन व इंटरनेट | २,१०,३६१.०५ | | | |
| ११,५४,१९६.२९ | दुरुस्ती व देखभाल | ११,०२,१६२.५९ | | | |
| १८,१३,१६९.४१ | ईतर खर्च | १७,४१,६८०.०० | | | |
| ४,००,०००.०० | घसारा व ईतर तरतूदी | ३०,५०,०००.० | | | |
| ५,५१,४१,६६८.१६ | एकुण खर्च | ६,२१,०३,०१६.९९ | ६,७४,४९,६५९.५४ | एकुण उत्पन्न | ७,८५,९३,८६८.८१ |
| १,२३,०७,९९१.३८ | नफा | १,६४,९०,८५१.८२ | -- | -- | -- |
| ६,७४,४९,६५९.५४ | एकुण उत्पन्न | ७,८५,९३,८६८.८१ | ६,७४,४९,६५९.५४ | एकुण उत्पन्न | ७,८५,९३,८६८.८१ |

## सन २०२४-२५ अंदाजपत्रकीय खर्चापेक्षा अधिकचा झालेला खर्च (रक्कम रु. लाखात)

| खर्च खाते तपशिल | अंदाजपत्रकीय खर्च | प्रत्यक्ष खर्च | जास्तीचा झालेला खर्च |
|---|---|---|---|
| १) दिलेले व्याज | ४१०.०० | ४३६.३१ | २६.३१ |
| २) ऑडीट व प्रोफेशन फीस | ४.०० | ५.८२ | १.८२ |
| ३) घसारा व तरतुदी | १०.०० | ३०.५० | २०.५० |
| एकुण : | ४२४.०० | ४७२.६३ | ४८.६३ |

## अंदाज पत्रक २०२५-२६ करिता (रक्कम रु. लाखात)

| अंदाजित खर्च | रक्कम | अंदाजित उत्पन्न | रक्कम |
|---|---|---|---|
| ठेवीवरील व ईतर व्याज | ४५०.०० | कर्ज व्याज | ६२५.०० |
| कर्मचारी पगार | १००.०० | बँक गुंतवणूक व्याज | १५०.०० |
| कर्म.भ.निधी व ग्रॅच्युईटी | १५.०० | ईतर उत्पन्न | २१.०० |
| एजंट कमिशन | १०.०० | | |
| ऑडीट व प्रोफेशन फी | ५.०० | | |
| टॅक्स, विमा व कार्यालय भाडे | १५.०० | | |
| स्टेशनरी छपाई व खरेदी | ३.०० | | |
| लाईट,फोन व इंटरनेट | ३.०० | | |
| दुरुस्ती व देखभाल | १५.०० | | |
| ईतर खर्च | २५.०० | | |
| घसारा व ईतर तरतुदी | १०.०० | | |
| एकूण खर्च | ६५१.०० | एकूण उत्पन्न | ७९६.०० |
| नफा | १४५.०० | --- | -- |
| एकूण उत्पन्न | ७९६.०० | एकूण उत्पन्न | ७९६.०० |

## उपविधी दुरुस्ती

| उपविधी क्रमांक | मुळ उपविधी शब्दरचना | दुरुस्तीनंतर होणारी उपविधी शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| संपुर्ण आदर्श उपविधी | नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे आदर्श उपविधी - २०१३ | नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे सुधारित आदर्श उपविधी स्विकारणे. | मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.: सआ-५/पत/ आदर्श उपविधी/ १८२२/ २०२५ दिनांक २९ जुलै, २०२५ अन्वये राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांना सुधारित आदर्श उपविधी लागू करणेबाबतच्या अंमलबजावणी करण्यासाठी |

## महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना

### एकत्रित ताळेबंद पत्रक

३१/०३/२०२५ अखेर

| ३१ मार्च,२०२४ अखेर | भांडवल व देणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर | ३१ मार्च,२०२४ अखेर | संपत्ती व येणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | १) अधिकृत भागभांडवल | | ५,००,००,०००.०० | १७,११,००६.०० | १) रोख शिल्लक | | २५,६८,६२७.५० |
| | एकुण ५००००० लाख भाग, प्रतीभाग मूल्य रु. १००/- | | | १७,११,००६.०० | रोख शिल्लक | २५,६८,६२७.५० | |
| | | | | | | | |
| ३,३७,८४,०००.०० | २) वसूल भागभांडवल | | ३,६२,३५,५००.०० | २,९०,७९,५२२.३३ | २) बँक शिल्लक | | २,५४,३६,९०७.१८ |
| ३,३७,८४,०००.०० | ३६२३५५ शेअर्स, रु. १०० प्रत्येकी | ३,६२,३५,५००.०० | | ९,४७,३७६.९९ | एस.बी.आय. बँक, बालसावंगी | ८,६६,५५८.९९ | |
| | | | | २३,८१,५७१.९४ | युनियन बँक, रोहिलागड | ३८,१५,४४८.५३ | |
| २,११,०३,४३१.०० | ३) राखीव निधी | | २,४२,४२,६३०.०० | ३७,५२६.०० | जिल्हा मध्य. बँक, जालना | ३८,१३२.०० | |
| २,११,०३,४३१.०० | राखीव निधी | २,४२,४२,६३०.०० | | ४२,१३,११८.५८ | एस.व्ही.सी. बँक, जालना | ४७,०९,३८३.०१ | |
| | | | | २,९२,३९६.८२ | चिखली बँक, जालना | ११,०१,३२६.३७ | |
| ५६,३३,१२,५८६.९२ | ४) ठेवी | | ५८,३९,६२,४४५.९१ | ११,३१,९९१.०० | गजानन अर्बन बँक, | २८,७२,४०१.०० | |
| ६,११,७६,१५३.१२ | बचत खाते ठेव | ६,२५,२४,०९५.११ | | ३३,६२,११८.५० | दिनदयाळ बँक, परतूर | ४५,१७,२४९.९६ | |
| २,६३,९४८.८० | चालू बचत खाते ठेव | २,२१,६०४.८० | | १,६२,९३,२३७.१४ | आय.सी.आय.सी | ६०,८६,८२६.७० | |
| ९,३७,८१४.०० | बालक बचत ठेव | १०,९०,२८६.०० | | ४,२०,०२५.३६ | डीसीबी बँक, जालना | १४,२९,५८०.६२ | |
| २६,३११.०० | पुनर्रगुंतवणूक ठेव | २६,३११.०० | | | | | |
| ४,८९,३०,०९२.०० | अल्प मुदती ठेव | ५,८१,५७,७३८.०० | | २१,३१,०८,००८.०० | ३) बँक गुंतवणूक | | २१,३५,७१,८३४.०० |
| ७,१६,२१,८४४.०० | मासिक प्राप्ती ठेव | ८,२९,३०,५२०.०० | | २,००,००,०००.०० | बँक ऑफ बडोदा | - | |
| ३५,१५,७७,७७३.०० | दीर्घ मुदती ठेव (१३ | ३५,०६,७३,१४६.०० | | ५०,००,०००.०० | युनियन बँक ऑफ इंडिया | - | |
| १,७३,२९,७४२.०० | मासिक आवर्ती ठेव | १,६८,७१,०६५.०० | | ३,२६,९७,४६४.०० | महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक | २,९७,६०,१६६.०० | |
| ७०,९९,८८६.०० | दैनिक अल्पबचत ठेव | ६२,२१,४९२.०० | | २५,००,०००.०० | जालना मध्यवर्ती सहकारी बँक | ५०,००,०००.०० | |
| ७,९६,६५२.०० | एजंट सुरक्षा ठेव | ९,१८,९०४.०० | | २,४१,४५,११४.०० | कॉसमोस बँक | २,८८,००,३४८.०० | |
| ३१,१५०.०० | लिंकिंग डीपॉझिट | २८,१५०.०० | | १,००,००,०००.०० | के.ए.इचलकरंजी जनता सह. | १,५६,४३,५४७.०० | |
| ३५,२१,२२१.०० | कर्मचारी सुरक्षा ठेव | ४२,९९,१३४.०० | | २,५०,४५,४७१.०० | एसव्हीसी बँक | २,४१,०२,०८१.०० | |
| | | | | २,५३,५९,८२५.०० | सारस्वत बँक | ३,०५,०१,३१८.०० | |
| ४१,९८,२४१.०० | ठेव देणे व्याज | | ३६,७५,४९१.०० | २,००,६३,३३४.०० | ठाणे जनता सह. बँक | २,५०,०४,०६९.०० | |

Page 1 of 4

### एकत्रित ताळेबंद पत्रक

३१/०३/२०२५ अखेर

| ३१ मार्च,२०२४ अखेर | भांडवल व देणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर | ३१ मार्च,२०२४ अखेर | संपत्ती व येणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १८,३३,९२९.०० | अल्प मुदती ठेव | १४,६०,०७८.०० | | १,४७,९६,०००.०० | जळगाव जनता सह. बँक | २,६०,२०,३४१.०० | |
| २३,६४,३१२.०० | मासिक आवर्ती ठेव | २२,१५,४१३.०० | | १,००,००,०००.०० | देवगिरी बँक, जालना | १,००,००,०००.०० | |
| | | | | १,२५,००,०००.०० | प्रियदर्शनी नागरी सह. बँक | १,२७,३९,९६४.०० | |
| ९,१५,३१,०५९.८६ | ५) निधी व तरतुदी | | ९,८७,९८,९३९.५४ | १,००,००,०००.०० | एयु स्माल फायनान्स बँक | - | |
| १,४२,६८,६०१.१८ | ईमारत निधी | १,६७,१३,०२३.५६ | | १०,००,०००.०० | जालना पीपल्स बँक | - | |
| ९९,९०,३३४.६८ | घसारा निधी | १,०८,७०,१७६.६८ | | - | जनता सहकारी बँक पुणे | ५०,००,०००.०० | |
| १०,००,०००.०० | लाभांश सामानिकरण निधी | १०,००,०००.०० | | - | वाशिम अर्बन बँक | १०,००,०००.०० | |
| १,५०,६४७.०० | धर्मदाय निधी | ६,४५,६४७.०० | | | | | |
| २,११,७२०.०० | भेटवस्तू तरतुद | २,११,७२०.०० | | २०,०००.०० | ४) भागातील गुंतवणूक | | २०,०००.०० |
| ३,३७,६७,०१३.०० | संशयित व बुडीत कर्ज | ३,३७,६७,०१३.०० | | ६,०००.०० | जिल्हा मध्य. बँक भाग | ६,०००.०० | |
| ५,४०,०००.०० | सभासद कल्याण निधी | ५,६०,०००.०० | | ३,०००.०० | राज्य पतसंस्था फेड. भाग | ३,०००.०० | |
| ५,३६,४९३.०० | ऑडीट फी तरतुद | ७,६९,४१७.३० | | १,०००.०० | जिल्हा पतसंस्था फेड. | १,०००.०० | |
| ३४,९४०.०० | निवडणूक निधी तरतुद | ३४,९४०.०० | | १०,०००.०० | म.रा.क्रेडीट को- | १०,०००.०० | |
| १०,००,०००.०० | उत्तम जिंदगी तरतुद | १०,५०,०००.०० | | | | | |
| १,३४,९२,०५०.०० | कॉटीजेन्सी तरतूद | १,६४,९२,०५०.०० | | २,१०,८७,८५५.०० | ५) निधी गुंतवणूक | | २,४७,५४,७४६.०० |
| १,६५,३१,२५३.०० | थकबाकी व्याज तरतुद | १,६६,७६,९५२.०० | | २,१०,८७,८५५.०० | राखीव निधी गुंतवणूक | २,४७,५४,७४६.०० | |
| | | | | | | | |
| २६,९२,१०५.३३ | ६) अनामती व ईतर देणी | | २६,७८,०१७.३३ | ५,४९,७७५.०० | ६) ईतर गुंतवणूक | | ५,४९,७७५.०० |
| १,८४,६१०.०० | देय लाभांश | १,७९,१६६.०० | | ५,१५,०००.०० | म.रा.वी.म. केंद्र, सुरक्षा | ५,१५,०००.०० | |
| २२,३५,७५१.३३ | सन्ड्री क्रेडीटर्स | २२,२३,०९६.३३ | | २८,७७५.०० | म.रा.वी.म. मीटर ठेव | २८,७७५.०० | |
| ६८४.०० | इन्शुरन्स | ६८४.०० | | ६,०००.०० | दूरध्वनी ठेव | ६,०००.०० | |
| - | लिलाव विक्री अनामत | | | | | | |
| ४,४००.०० | प्रोफेशन टॅक्स | ४,४००.०० | | ४०,५८,४७,२६५.४२ | ७) येणे कर्ज | | ४४,१२,०५,६६५.५० |
| ८७,५६०.०० | कर्मचारी भविष्य निधी | ९१,८२६.०० | | २,४७,४३,३८६.४२ | कॅश क्रेडीट कर्ज | २,३१,७६,५७४.०० | |
| - | टि.डी.एस. अनामत | १२,०५५.०० | | ४,३३,२९०.०० | पगार तारण कर्ज मर्यादा | ७,५६२.०० | |
| १,२९,१००.०० | शेअर्स अनामत | ९६,७९०.०० | | १,०६,९५,८०१.०० | गोदाम माल तारण कर्ज | २६,१२,०४०.०० | |
| ५०,०००.०० | तात्पुरते कर्मचारी | ७०,०००.०० | | ९,११,२२८.०० | प्रोजेक्ट कर्ज | - | |

Page 2 of 4

## एकत्रित ताळेबंद पत्रक

३१/०३/२०२५ अखेर

| ३१ मार्च,२०२४ अखेर | भांडवल व देणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर | ३१ मार्च,२०२४ अखेर | संपत्ती व येणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ११,२१,०८,०७९.०० | सोने तारण कर्ज | १४,०१,९०,१६६.०० | |
| १,२३,०७,९९१.३८ | ७) नफा | | १,६४,९०,८५१.८२ | ३५,२९,३९२.०० | पगारदार कर्ज | २८,२१,२८९.०० | |
| १,२३,०७,९९१.३८ | चालू वार्षिक नफा | १,६४,९०,८५१.८२ | | ५,१६,४७,८७८.०० | व्यवसाय कर्ज | ५,०२,४३,७९२.५० | |
| - | मागील संचित नफा | - | | ९९,६३,८७९.०० | वाहन कर्ज | १,०९,४१,०६५.०० | |
| | | | | १६,९३,११,३८५.०० | स्थावर मालमत्ता तारण | १९,३८,३३,६६०.०० | |
| | | | | २,६३,४३२.०० | तारणी शेती उपयोगी कर्ज | - | |
| | | | | ६३,०४,२५६.०० | संस्था कर्मचारी कर्ज | ४९,२३,७०२.०० | |
| | | | | १२,०१,१७३.०० | गृह कर्ज | १०,१३,५४१.०० | |
| | | | | १,४२,७६,३६८.०० | मुदत ठेव तारण कर्ज | १,०८,९०,६५०.०० | |
| | | | | ३१,०००.०० | दैनिक अल्पबचत ठेव | १,७७,६००.०० | |
| | | | | ४,१८,७१८.०० | मासिक आवर्ती ठेव | ३,७४,०२४.०० | |
| | | | | | | | |
| | | | | ३,६३,४३,४३८.०० | ८) येणे कर्ज व्याज | | ३,६२,९६,२९१.०० |
| | | | | ३,६३,४३,४३८.०० | कर्जावरील येणे व्याज | ३,६२,९६,२९१.०० | |
| | | | | | | | |
| | | | | ३३,६१,३८७.६५ | ९) ईतर येणी | | ३६,६२,३०७.६० |
| | | | | ५७,२१७.०० | आयकर रिफंड | ५७,२१७.०० | |
| | | | | २,७८,४७६.२३ | म.रा.वि.म. कमिशन | १,७४,९७८.१४ | |
| | | | | ५९,४४२.०० | ईतर अग्रिम | ५९,४४२.०० | |
| | | | | १४,२८,१६७.५९ | कपात टि.डी.एस. येणे | १८,९९,६३१.३९ | |
| | | | | २,२०,२०९.४६ | सीजीएसटी येणे (सनव्हॅट) | १,९०,२२२.५९ | |
| | | | | १,८६,९७५.२७ | एसजीएसटी येणे | १,४९,६३८.३८ | |
| | | | | ३,०६७.६२ | सीजीएसटी रिव्हर्स चार्ज | ३,०६७.६२ | |
| | | | | ३,०६७.६२ | एसजीएसटी रिव्हर्स चार्ज | ३,०६७.६२ | |
| | | | | १०,६१,०००.०० | आय.टी. अपील | १०,६१,०००.०० | |
| | | | | १५,९१४.५९ | सीजीएसटी टिडीएस येणे | १६,०५३.५९ | |
| | | | | १५,६०२.५९ | एसजीएसटी टिडीएस येणे | १५,७४१.५९ | |
| | | | | ३२,२४७.६८ | आयजीएसटी टिडीएस | ३२,२४७.६८ | |

Page 3 of 4

## एकत्रित ताळेबंद पत्रक

३१/०३/२०२५ अखेर

| ३१ मार्च,२०२४ अखेर | भांडवल व देणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर | ३१ मार्च,२०२४ अखेर | संपत्ती व येणी | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | १,१३,६९,८०८.०९ | १०) जंगम मालमत्ता | | १,१५,६६,३७१.८२ |
| | | | | ३,४०,०००.०० | सोलार पॉवर सिस्टीम | ३,४०,०००.०० | |
| | | | | ४६,३३,८४०.१२ | फर्निचर व फिक्चर्स | ४६,४१,८९०.१२ | |
| | | | | १४,३२,६१६.०० | चारचाकी वाहन | १४,३२,६१६.०० | |
| | | | | ३,५६,५८९.२८ | दुचाकी वाहन | ३,५६,५८९.२८ | |
| | | | | २०,४५,७७५.६९ | इलेक्ट्रॉनिक्स व | २२,३४,२८९.४२ | |
| | | | | ६३,४८८.०० | मनी बॉक्स | ६३,४८८.०० | |
| | | | | २४,९७,४९९.०० | स्ट्राँगरूम डोअर्स व | २४,९७,४९९.०० | |
| | | | | | | | |
| | | | | ६४,५१,३५०.०० | १०) स्थावर मालमत्ता | | ६४,५१,३५०.०० |
| | | | | ६४,५१,३५०.०० | मुख्य कार्यालय इमारत, | ६४,५१,३५०.०० | |
| | | | | | | | |
| ७२,८९,२९,४१५.४९ | एकुण | | ७६,६०,८३,८७५.६० | ७२,८९,२९,४१५.४९ | एकुण | | ७६,६०,८३,८७५.६० |

For Loya & Mundada
Chartered Accountants
Firm Registration No/132811W

CA Lokesh B. Godha
Partner
Membership No.144922

मुख्य कार्यकारी अधिकारी
महालक्ष्मी नागरी सहकारी
पतसंस्था मर्यादित, जालना

अध्यक्ष
महालक्ष्मी नागरी सहकारी
पतसंस्था मर्या.,जालना

Page 4 of 4

एकत्रित नफातोटा पत्रक
( ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ )

| ३१ मार्च,२०२४ अखेर | खर्च बाजू | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर | ३१ मार्च,२०२४ अखेर | उत्पन्न बाजू | ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ | ३१ मार्च,२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५,३४०.०० | पेपर व मॅगझीन बिल | १६,१३७.०० | | | | | |
| २,८०,३५६.०० | वाहन ईंधन व ऑईल | १,९८,३७१.०० | | | | | |
| २०,१७२.०० | पोस्टेज व स्टॅम्पस | १७,८७५.०० | | | | | |
| १०,४८०.०० | कर्मचारी गणवेश | - | | | | | |
| २,०००.०० | जिल्हा फेडरेशन वार्षिक वर्गणी | २,०००.०० | | | | | |
| १,८०,०००.०० | जिल्हा फेडरेशन (SRO) | १,८०,०००.०० | | | | | |
| ३,१३८.५४ | बँक कमिशन व चार्जेस | २,८८१.२६ | | | | | |
| - | आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष खर्च | ६६,४९०.०० | | | | | |
| १९,०१६.७१ | शाखा अस्थापना खर्च | - | | | | | |
| १,९००.०० | क्रास चार्जेस | - | | | | | |
| ३.५४ | डेसिमल रॉउंडिंग फरक | १.६३ | | | | | |
| ४,००,०००.०० | ११) घसारा व तरतूद | | ३०,५०,०००.०० | | | | |
| ४,००,०००.०० | वैधानिक व टॅक्स ऑडीट फी | - | | | | | |
| - | उत्तम जिंदगी (एनपीए) तरतूद | ५०,०००.०० | | | | | |
| - | एनपीए खाते व्याज तरतुद | ३०,००,०००.०० | | | | | |
| ५,५१,४१,६६८.१६ | एकुण खर्च | | ६,२१,०३,०१६.९९ | ६,७४,४९,६५९.५४ | एकुण उत्पन्न | | ७,८५,९३,८६८.८१ |
| १,२३,०७,९९१.३८ | निव्वळ नफा | | १,६४,९०,८५१.८२ | - | | | - |
| ६,७४,४९,६५९.५४ | एकुण उत्पन्न | | ७,८५,९३,८६८.८१ | ६,७४,४९,६५९.५४ | एकुण उत्पन्न | | ७,८५,९३,८६८.८१ |

मुख्य कार्यकारी अधिकारी
महालक्ष्मी नागरी सहकारी
पतसंस्था मर्यादित, जालना

अध्यक्ष
महालक्ष्मी नागरी सहकारी
पतसंस्था मर्या.,जालना.

For Loya & Mundada
Chartered Accountants
Firm Registration No.132811W

CA Lokesh B. Godha
Partner
Membership No.144922

Page 3 of 3

## कर्मचारी सेवानियम-२०२२ दुरुस्ती

| सेवानियम क्रमांक | मुळ सेवानियम शब्दरचना | दुरुस्तीनंतर होणारी सेवानियम शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| २४)<br>टेबल अ.क्र.: | वेतनश्रेणी :<br>७) वाहन चालक -<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | २४) वेतनश्रेणी :<br>७) वाहन चालक/वसुली सहायक -<br>वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | |
| १) | वाहन चालक हे पद जो पर्यंत संस्थेच्या स्वमालकीचे वाहन आहे तो पर्यंतच सदरील वेतनश्रेणीमध्ये त्याची सेवा चालु राहील. कोणत्याही कारणास्तव संस्थेकडचे वाहन कमी झाल्यास वाहन चालक या पदावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यास नंतर केंव्हाही वाहन चालक या पदावरुन कमी करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील. | १) वाहन चालक हे पद जो पर्यंत संस्थेच्या स्वमालकीचे वाहन आहे तो पर्यंतच सदरील वेतनश्रेणीमध्ये त्याची सेवा चालु राहील. कोणत्याही कारणास्तव संस्थेकडचे वाहन कमी झाल्यास वाहन चालक या पदावर काम करीत असलेल्या कर्मचाऱ्यास नंतर वसुली सहाय्यक म्हणुन नेमणुक करण्यात येईल. त्याचा वेतनश्रेणीवर कुठलाही परिणाम होणार नाही. | कोणत्याही कारणास्तव संस्थेकडील वाहन कमी झाल्यास कर्मचारी सेवा कायम राहणेसाठी. |
| ६) | निरंक | ६) संस्थेचे सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यास संस्थेबाहेरील कोणत्याही संस्थेमध्ये कर्जदार, सह-कर्जदार, संमतीधारक व जामीनदार म्हणुन जबाबदारी स्वीकारायची असल्यास त्याला संस्थेची पुर्वपरवानगी अनिवार्य राहील. | मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक जा.क्र.: सआ-५/पतसंस्था/ नि.मं.सुचना/ कर्ज विषयक नियम/ १५१९/२०२५ दिनांक २७ जुन २०२५ मधील इ) कर्जवितरण वैधानिक बंधने :- अ.क्र.१० प्रमाणे. |

## * भावपुर्ण श्रद्धांजली *

अहवाल सालात दिवंगत झालेले विविध क्षेत्रातील मान्यवर,
सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ, थोर साहित्यिक,
ज्ञात-अज्ञात थोर विचारवंत, भारतभूमीचे रक्षण करतांना व
दहशतवाद्यांशी सामना करतांना शहीद झालेल्या जवानांना, पहेलगाम येथील भ्याड हल्यात मृत
पावलेल्या पर्यटकांना, नैसर्गिक आपत्तीने मृत पावलेल्यांना
तसेच दिवंगत झालेले संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक, यांना
आम्ही भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.
दिवंगतांच्या कुटुंबियांच्या दु:खात
महालक्ष्मी पतसंस्था परिवार सहभागी असून, मृतांच्या आत्म्यास सद्‌गती लाभो,
हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

### सभासदांना विनंती :-

१) ज्या सभासदांना शेअर्स सर्टिफिकेट अद्याप मिळाली नसतील कृपया त्यांनी ती मुख्य कार्यालय जालना येथुन नेण्याचे करावे.
२) संस्थेच्या दप्तरी आपल्या वारसाची नोंद करावी.
३) आपला पत्ता बदलला असल्यास नवीन पत्ता आपल्या नजीकच्या शाखेत लेखी कळवावा.
४) आपल्याशी संस्थेचा सुलभ संपर्कासाठी तसेच एसएमएस व ईतर माहितीसाठी आपला अद्यावत व्हॅटस्‌ॲप मोबाईल क्रमांक आपल्या नजीकच्या शाखेत लेखी कळवावा.
५) सभासदांना दरवर्षी देण्यात येणारी लाभांश रक्कम त्यांचे संस्थेमध्ये असलेल्या बचत खाते जमा केली जाते. ज्या सभासदांचे बचत खाते नसेल त्यांनी तत्काळ नजीकच्या शाखेत खाते उघडुन घ्यावे. नसता लाभांश रक्कम नियमानुसार राखीव निधीत वर्ग करण्यात येईल.
६) आपण घेतलेल्या अथवा जामीन असलेल्या कर्जाचे हफ्ते अथवा रक्कम वेळेवर भरले जातील याची काळजी घ्यावी.
७) नजरचुकीने अथवा तांत्रिकदृष्ट्या अहवालात काही त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सन्माननीय सभासदांनी क्षमा करावी.

## बुक पोस्ट

श्री व श्रीमती ---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

**महालक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना**
(नोंदणी क्र. जेएएल/जेएएल/आरएसआर/सीआर/348/1995-96, दि.19/02/1996)
**मुख्य कार्यालय : मस्तगड, जालना**
**संपर्क क्र. : 75593 94857**
**Email : mahalaxmi.jalna@gmail.com**
**Website : www.mahalaxmipsjln.in**